१५ जिल्ह्यांमधील नगर परिषदा /नगर पंचायतींच्या सदस्य व अध्यक्ष पदांच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम-२०१८

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र. रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.८/का.६

निवडणूक प्राथम्य
ई-मेल

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक : १५/०६/२०१८.

प्रति,
जिल्हाधिकारी,
पालघर, रायगड, रत्नागिरी, पुणे, सोलापूर, सातारा, नाशिक, जळगाव, अहमदगनर, नंदुरबार, उस्मानाबाद, अकोला, बुलढाणा, नागपूर व भंडारा (१५ जिल्हे)

**विषय :-** नगर परिषदा/ नगर पंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुका जुलै - २०१८ प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम.

**संदर्भ :-** १) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.९/का-६, दि.१८/०५/२०१८ चे आदेश.
२) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६.
३) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१७.

महोदय,

सोबतच्या परिशिष्ट-२ मधील नमूद ६ नगर परिषदा/नगरपंचायतींमधील सदस्य व अध्यक्ष पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रभाग रचना, आरक्षण व सोडत शासन राजपत्रात अंतिमरित्या प्रसिध्द झालेली असून या नगरपरिषदा/नगरपंचायती व शेगाव नगर परिषदेच्या हद्दवाढ क्षेत्रासाठी, राजापूर नगर परिषदेच्या रिक्त अध्यक्ष पदाची तसेच अन्य रिक्त असलेल्या सदस्य पदांच्या पोट निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम देण्यात आला होता. त्यानुसार संबंधित कार्यक्रम विहित कालावधीत पार पडले आहेत.

२. त्यानंतर आयोगाकडून संदर्भाधीन अ.क्र. १ येथील आदेशान्वये परिशिष्ट-२ मधील नमूद ६ नगर परिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्ष व सदस्य पदांच्या सार्वत्रिक व इतर नगर परिषदा तसेच नगर पंचायतींमधील रिक्त पदांची पोट निवडणूक घेण्याकरिता पूर्वतयारीबाबत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

३.	राज्य शासनाने संदर्भाधीन अ.क्र.२ येथील अध्यादेश प्रख्यापित केला असून त्यानुसार "महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६ (सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक १६ )", दिनांक १९/०५/२०१६ व दि.३०/०८/२०१६ अन्वये नगर परिषदांच्या नगराध्यक्षांची निवड थेट जनतेमधून करण्याची पध्दती लागू केली आहे. तसेच दि.०४/१०/२०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे अध्यक्ष पदाचे निवडणूक नियम, २०१६ शासन राजपत्रात प्रसिध्द केले असून निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नगर परिषदेच्या अध्यक्ष पदाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्राप्त होणाऱ्या नामनिर्देशनपत्रावर कार्यवाही करावी.

४.	राज्य शासनाने संदर्भाधीन अ.क्र.३ येथील अध्यादेश प्रख्यापित केला असून त्यानुसार "महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१७ (सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक २५)" दिनांक ०२/११/२०१७ अन्वये नगर पंचायतींमधील नगराध्यक्षांची निवड थेट जनतेमधून करण्याची पध्दती लागू केली आहे. त्यामधील तरतुदींनुसार निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नगर पंचायतींच्या अध्यक्ष पदाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्राप्त होणाऱ्या नामनिर्देशनपत्रावर कार्यवाही करावी.

५.	आता, या पत्रान्वये **भोर** व **नवनिर्मित वानाडोंगरी** या २ नगर परिषदा, **नवनिर्मित मुक्ताईनगर, बार्शीटाकळी, वडगाव व पारशिवनी** या ४ नगरपंचायतींमधील सदस्य व अध्यक्ष पदांच्या सार्वत्रिक, **शेगाव** नगर परिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राकरिता तसेच **राजापूर** नगर परिषदेच्या रिक्त अध्यक्ष पदाकरिता व अन्य नगर परिषदा / नगरपंचायतींमधील १० रिक्त सदस्य पदांच्या पोट निवडणुकीकरिता प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम **परिशिष्ट-१** प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे. सार्वत्रिक व पोट निवडणुका असलेल्या नगर परिषदा / नगर पंचयातींचा तपशील **परिशिष्ट-२** नुसार आहे.

६.	निवडणुकीची आचारसंहिता आजपासून लागू झाली असून ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. वरील आचारसंहिता सार्वत्रिक निवडणूक असलेल्या संपूर्ण संबंधित नगर परिषद व नगर पंचायतींच्या क्षेत्रामध्ये व राजापूर नगर परिषदेच्या अध्यक्ष पदाची पोट निवडणूक असल्याने संपूर्ण नगर परिषद क्षेत्रामध्ये तसेच इतर पोट निवडणूक असलेल्या संपूर्ण प्रभागात आचारसंहिता लागू राहील. उपरोक्त क्षेत्रातील मतदारांवर विपरित प्रभाव टाकणारी कोणतीही कृती / घोषणा कोणत्याही मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक किंवा इतर पदाधिकाऱ्यांना इतरत्र सुध्दा करता येणार नाही.

७.	सार्वत्रिक निवडणूक असलेल्या नगर परिषदा/नगर पंचायतींच्या प्रभाग रचना व सार्वत्रिक तसेच पोट निवडणूक असलेल्या नगर परिषदा / नगर पंचायतींच्या मतदार यादीसंदर्भात न्यायालयात याचिका दाखल

झाल्या असल्यास याबाबतची खातरजमा करुन न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच कोणत्याही रिट याचिकेमध्ये मा.न्यायालयाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास निवडणूक कार्यक्रम तात्काळ रद्द / स्थगित करुन तसे आयोगास अवगत करावे.

८. राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन दिनांक १८/०५/२०१८ च्या व इतर पत्रातील सूचनांनुसार काटेकोरपणे कार्यवाही करण्यात यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

सहपत्र- परिशिष्ट-१ व २

(संजय सावंत) १५.०६.२०१८
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-
१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
६) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभाग.
८) संबंधित जिल्हा पोलिस अधिक्षक
९) संबंधित नगर परिषदा व नगर पंचायतींचे प्रशासक व मुख्याधिकारी
१०) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई- ४०० ००४.
११) राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनलवरील सर्व वकील
१२) सहायक आयुक्त, संगणक कक्ष, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१३) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१४) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने
१५) निवड नस्ती (का.६), राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

## परिशिष्ट -१ (सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी)

**(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.८/का.६, दि.१५/०६/२०१८ सोबतचे सहपत्र.)**

(i) नवनिर्मित **बार्शीटाकळी** नगरपरिषदेच्या अध्यक्ष व सदस्य पदांची सार्वत्रिक निवडणूक

(ii) दि.१८/०७/२०१८ रोजी मुदत संपणारी **मोर** व नवनिर्मित **वानाडोंगरी** या २ नगर परिषदेच्या अध्यक्ष व सदस्य पदांच्या, नवनिर्मित **मुक्ताईनगर, वडगाव व पारशिवनी** या ३ नगरपंचायतींच्या अध्यक्ष व सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुका तसेच **शेगाव** नगर परिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राकरिता निवडणूक

(iii) नगर परिषदा/नगरपंचायतींच्या सोबतच्या परिशिष्ट-२ मधील नमूद १० रिक्त सदस्य पदांच्या व **राजापूर** नगर परिषदेच्या अध्यक्ष पदाची पोट निवडणुका.

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/संपविण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख | **१८/०६/२०१८ (सोमवार)** |
| २ | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरीता उपलब्ध असण्याचा कालावधी. | १९/०६/२०१८ (मंगळवार) ते २५/०६/२०१८(सोमवार) (स.११.०० ते दु.०३.०० पर्यंत) |
| ३ | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | १९/०६/२०१८ (मंगळवार) ते २५/०६/२०१८(सोमवार) (स.११.०० ते दु.०३.०० पर्यंत) **शनिवार दि.२३/०६/२०१८ व रविवार दि.२४/०६/२०१८ या दोन सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाही.** |
| ४ | नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | २६/०६/२०१८ (मंगळवार) सकाळी ११.०० वाजल्यापासुन |
| ५ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक **अपील नसेल तेथे** | २ जुलै, २०१८ (सोमवार) दुपारी ३ वाजेपर्यंत |
| ५-अ | **अपील असल्यास** | **अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वी** |
| ६ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | **उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी** |
| ७ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | १५/०७/२०१८ (रविवार) **सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत** |
| ८ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | १६/०७/२०१८ (सोमवार) सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| ९ | **महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे** | **कलम १९ आणि ५१-अ-१अ (९) मधील तरतुदींनुसार** |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(संजय सावंत) १५.०६.२०१८

कक्ष अधिकारी,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

C:\Users\kesharsing.sulane\Desktop\नांदेड-वाघाळा मनपा.docx

## परिशिष्ट -२ ( सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी)

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.८/का-६,
दि.१५/०६/२०१८ सोबतचे सहपत्र.

| अ.क्र. | जिल्हा | सार्वत्रिक निवडणूक असलेल्या नगर परिषदा / नगरपंचायतींचे नावे | मुदत समाप्तीचा दिनांक | पोट निवडणूक असलेल्या निवडणुकीचा प्रभाग व जागा क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | पालघर | -- | -- | जव्हार - ६-ब |
| २ | रायगड | -- | -- | पोलादपूर - १६ |
| ३ | रत्नागिरी | -- | -- | राजापूर - अध्यक्ष |
| ४ | पुणे | भोर | १८/०७/२०१८ | -- |
| ५ | पुणे | वडगाव | नवनिर्मित | -- |
| ६ | सोलापूर | -- | -- | पंढरपूर - १०-ब |
| ७ | सातारा | -- | -- | वाई - ५-अ |
| ८ | सातारा | -- | -- | मेढा - १५ |
| ९ | नाशिक | -- | -- | निफाड - ६ |
| १० | अहमदनगर | -- | -- | श्रीरामपूर - १२-अ |
| ११ | जळगाव | मुक्ताईनगर | नवनिर्मित | -- |
| १२ | नंदुरबार | -- | -- | नंदुरबार - १६-अ |
| १३ | उस्मानाबाद | -- | -- | लोहारा बु. - २ |
| १४ | अकोला | बार्शीटाकळी | नवनिर्मित | -- |
| १५ | बुलढाणा | शेगाव | हद्दवाढ क्षेत्राची | -- |
| १६ | नागपूर | वानाडोंगरी | नवनिर्मित | -- |
| १७ | नागपूर | पारशिवनी | नवनिर्मित | -- |
| १८ | भंडारा | -- | -- | मोहाडी - १२ |